॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 13 — TRAYODASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah| Shri Saraswatyai Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

At Badrikashrama, Lord Shiva explains that complex Vedic and weapon mantras will fail to work in the upcoming Kali Yuga, creating an urgent need for Shabari Kavitva—sacred verses written in the common tongue accessible to all humanity. To accomplish this, Shiva divides a massive repository of verses among the Nine Naths, directing Jalandhar and Kanifa to compose over forty crore verses before receiving the blessings of the fifty-two celestial Veers. Leaving Kanifa to perform his essential penance upon iron thorns under Shiva's protection, Jalandhar sets out on a solitary pilgrimage, his bundle of grass miraculously floating above his head due to the wind god Vayu's affection. He eventually arrives in the prosperous kingdom of Gauda-Bangal, choosing to lodge in a foul, abandoned alleyway to test the devotion of the material world. Recognizing his hidden divinity from her terrace, the royal matriarch Mainavati fearlessly braves his aggressive supernatural tests and serves the master in absolute humility for six months. After testing her ultimate fortitude by engineering an agonizing mystical wound which she endures without flinching, Jalandhar heals her and grants her absolute immortality via the Taraka mantra. Safe from the clutches of cosmic death, the grateful queen immediately experiences a deep, protective longing to secure the exact same divine immortality for her ruling son, Gopichand.

Ovee 1

जयजयाजी त्रिभुवनेशा । मच्छकच्छवराहनरसिंहवामनवेषा । भार्गव राघव द्वारकाधीशा । पूर्णब्रह्मा सर्वज्ञा ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Tribhuvaneshaa | Machcha-Kachcha-Varaaha-Narasimha-Vaamana-veshaa | Bhaargava Raaghava Dvaarakaa-Adheeshaa | Poorna-Brahmaa sarvajnyaa ||

Ovee 2

हे गुणातीता सकलगुणज्ञा । अव्यक्तव्यक्ता सर्वज्ञा । पूर्णब्रह्म अचल सर्वज्ञा । बौद्ध कलंकी आदिमूर्ते ॥

Transliteration

Hey gunaateetaa sakala-gunajnyaa | Avyakta-vyaktaa sarvajnyaa | Poorna-Brahma achala sarvajnyaa | Bauddha kalankee Aadi-moorte ||

Ovee 3

मागिले अध्यायीं केले कथन । श्रीजालिंदरा होऊनि जन्म । तप आचरोनि अत्रिनंदन । संपादिला गुरुत्वीं ॥

Transliteration

Maagile adhyaayee kele kathanu | Shree Jaalindaraa houni janmu | Tapa aacharoni Atrinandanu | Sampaadilaa gurutvee ||

Ovee 4

तो समर्थ अत्रिसुत । प्रसन्न झाला सद्विद्येंत । तयावरुतें सकळ दैवत । गौरविलें पावकें ॥

Transliteration

Toh samartha Atrisutu | Prasanna jhaalaa sadvidyentu | Tayaavarute sakala daivatu | Gauravile paavake ||

Ovee 5

स्कंधी वाहूनि द्विमूर्धनी । पृथक दैवतें स्थानीं स्थानीं । सत्य लोकांदि अमरा पाहूनि । वैकुंठादि पाहिलें ॥

Transliteration

Skandhee vaahuni Dvi-moordhanee | Prithaka daivate sthaanee sthaanee | Satya lokaandi amaraa pahuni | Vaikunthaadi paahile ||

Ovee 6

पाहिलें इंद्र चंद्रस्थान । मित्र वरुण गंधर्वा भेटून । सुवर्लोक भुवर्लोक तपोलोकादि पाहून । वरालागीं आणिलें ॥

Transliteration

Paahile Indra chandra-sthaanu | Mitra Varuna gandharvaa bhetunu | Suvarloka Bhuvarloka Tapolokaadi pahunu | Varaa-laagee aanile ||

Ovee 7

यक्ष राक्षस किन्नरांसहित । गणगंधर्वादि गौरवूनि समस्त । वश केला जालिंदरनाथ । अस्त्रविद्येकारणें ॥

Transliteration

Yaksha raakshasa kinnaraan-sahitu | Gana-gandharvaadi gauravuni samastu | Vasha kelaa Jaalindara-Naathu | Astra-vidye-kaarane ||

Ovee 8

याउपरी कानिफा कर्णोदय । होऊनि झाला विद्यामय । तयाच्या वराकरितां सर्व देव । सकल दैवतें विटंबिली ॥

Transliteration

Yaa-uparee Kaaniphaa karnodayu | Houni jhaalaa vidyaamayu | Tayaachyaa varaa-karitaa sarva devu | Sakala daivate vitambilee ||

Ovee 9

विटंबोनि आपुले शक्ती । प्रसन्न केलें वराप्रती । उपरी गेले स्वस्थाना निगुती । आश्रम बद्रिका सांडूनि ॥

Transliteration

Vitamboni aapule shaktee | Prasanna kele varaa-pratee | Uparee gele svasthaanaa nigutee | Ashrama Badrikaa sanduni ||

Ovee 10

परी उमावर आणि रमावर । कानिफा आणि जालिंदर । बद्रिकाश्रमीं राहूनि स्थिर । करिती विचार तो कैसा ॥

Transliteration

Paree Umaavara aani Ramaavaru | Kaaniphaa aani Jaalindaru | Badrikaa-Ashramee rahuni sthiru | Karitee vichaara toh kaisaa ||

Ovee 11

एकमेकां बोलती हांसून । आठवूनि देवतांचे विमुंडमुंडन । प्रसन्न झाले विटंबून । बुद्धिहीन हें कैसे ॥

Transliteration

Ekamekaa bolatee hansunu | Aathavuni devataanche vimunda-mundanu | Prasanna jhaale vitambunu | Buddhi-heena hey kaise ||

Ovee 12

परी धन्य जालिंदर मिळाला यांसी । अवस्था दारुण महीसी । पूर्वी भिडले अपार राक्षसांसी । परी ऐसा मिळाला नाहीं त्यां ॥

Transliteration

Paree dhanya Jaalindara milaalaa yaansee | Avasthaa daaruna maheensee | Poorvee bhidale apaara raakshasaansee | Paree aisaa milaalaa naahee tyaa ||

Ovee 13

उफराटे नग्नदेही । अधो पाहत होते मही । ऐसे उचित कदा देही । मिळाले नाहीं तयांसीं ॥

Transliteration

Upharaate nagna-dehee | Adho paahata hote mahee | Aise uchita kadaa dehee | Milaale naahee tayaansee ||

Ovee 14

ऐसे बोलोनि उत्तरोत्तर । हास्य करिती वारंवार । मेळवूनि करास कर । टाळी पिटिती विनोदें ॥

Transliteration

Aise boloni uttarottaru | Haasya karitee vaaram-vaaru | Melavuni karaasa karu | Taalee pititee vinode ||

Ovee 15

असो ऐसी विनोदशक्ती । यावरी बोले उमापती । हे महाराज जालिंदरा जती । चित्त दे या वचनातें ॥

Transliteration

Aso aisee vinoda-shaktee | Yavaree bole Umaapatee | Hey Mahaaraaja Jaalindaraa jatee | Chitta de yaa vachanaate ||

Ovee 16

नागपत्रअश्वत्थस्थानीं । पूर्ण यज्ञआहुती करोनी । प्रथम कवित्त्वा रचोनि । वरालागीं साधावें ॥

Transliteration

Naaga-patra-Ashvattha-sthaanee | Poorna yajnya-aahutee karonee | Prathama kavitvaa rachoni | Varaa-laagee saadhaave ||

Ovee 17

वेदविद्या मंत्र बहुत । अस्त्रविद्या प्रतापवंत । परी ते महीवरी पुढें कलींत । चालणार नाहीं महाराजा ॥

Transliteration

Veda-vidyaa mantra bahutu | Astra-vidyaa prataapa-vantu | Paree tey maheevaree pudhe kaleentu | Chaalanaara naahee Mahaaraajaa ||

Ovee 18

मग मंत्रशक्ती उपायतरणी । कांहींच न मिळे लोकांलागुनी । मग ते दुःखप्रवाहशमनीं । सकळ लोक पडतील ॥

Transliteration

Maga mantra-shaktee upaaya-taranee | Kanheencha na mile lokaa-laagunee | Maga tey duhkha-pravaaha-shamanee | Sakala loka padateelu ||

Ovee 19

तरी सिद्ध करुनि आतां कविता । आर्वतिजे नागाश्वत्था । सकल विद्या करुनि हाता । कानिफातें ओपिजे ॥

Transliteration

Taree Siddha karuni aataa kavitaa | Aarvatije naagaa-shvatthaa | Sakala vidyaa karuni haataa | Kaaniphaate opije ||

Ovee 20

या कानिफाची उदार शक्तिस्थिती । मिरवत आहे दांभिकवृत्ती । तरी बरवी आहे कार्याप्रती । पुढें पडेल महाराजा ॥

Transliteration

Yaa Kaaniphaachee udaara shakti-sthitee | Miravata aahe daambhika-vrittee | Taree baravee aahe kaaryaa-pratee | Pudhe padela Mahaaraajaa ||

Ovee 21

हा अपार शिष्य करील पुढती । विद्या वरितील याच्या हातीं । मग ती प्रतिष्ठा लोकांपरती । सर्व जगीं मिरवेल ॥

Transliteration

Haa apaara shishya kareela pudhatee | Vidyaa variteela yaachyaa haatee | Maga tee pratishthaa lokaam-paratee | Sarva jagee miravelu ||

Ovee 22

पूर्वी सांबरी ऋषीनें मार्ग । काढिला आहे शुभयोग । परी थोडकी विद्या चांग । महीलागीं पुरेना ॥

Transliteration

Poorvee Saambaree Risheene maargu | Kaadhilaa aahe shubha-yogu | Paree thodakee vidyaa chaangu | Mahee-laagee purenaa ||

Ovee 23

तरी शतकोटी सांबरीगणा । महीतें मिरवावें शुभवचना । सकळास्त्रांची आणूनि भावना । महीलागी मिरवावी ॥

Transliteration

Taree shata-kotee Saambaree-ganaa | Maheete miravaave shubha-vachanaa | Sakala-astraanchee anuni bhaavanaa | Mahee-laagee miravaavee ||

Ovee 24

तरी या कवितेची वांटणी । मिरवावी नवनाथालागुनी । कोणती कैसी गतीलागुनी । सांगतों मात ते ऐका ॥

Transliteration

Taree yaa kavitechee vaantanee | Miravaavee nava-Naathaa-laagunee | Konatee kaisee gatee-laagunee | Saangato maata tey aikaa ||

Ovee 25

पूर्वी मच्छिंद्रानें धरुनि लक्ष । काव्य केलें आहे प्रत्यक्ष । तेहतीस कोटी पंचाण्णव लक्ष । मंत्रविद्युल्लता मिरविल्या ॥

Transliteration

Poorvee Machchindraane dharuni lakshu | Kaavya kele aahe pratyakshu | Tehateesa kotee panchaannava lakshu | Mantra-vidyullataa miravilyaa ||

Ovee 26

यापरी गोरक्षगोष्टी होटीं । मिरवेल नव लक्ष बारा कोटी । पंच कोटी एक लक्ष शेवटीं । मीननाथ मिरवेल ॥

Transliteration

Yaaparee Goraksha-goshtee hotee | Miravela nava laksha baaraa kotee | Pancha kotee eka laksha shevatee | Meena-Naatha miravelu ||

Ovee 27

नव कोटी सात लक्ष । चर्पटनाथ करील कीं प्रत्यक्ष । सात कोटी चार लक्ष । भरतरीनाथ करील कीं ॥

Transliteration

Nava kotee saata lakshu | Charpata-Naatha kareela kee pratyakshu | Saata kotee chaara lakshu | Bharataree-Naatha kareela kee ||

Ovee 28

तीन लक्ष दोन कोटी । रेवणनाथ करील शेवटीं । एक लक्ष एक कोटी । वटसिद्धनाथ करील कीं ॥

Transliteration

Teena laksha dona kotee | Revana-Naatha kareela shevatee | Eka laksha eka kotee | Vata-Siddha-Naatha kareela kee ||

Ovee 29

चौतीस कोटी बारा लक्ष । श्रीजालिंदरानें करावें प्रत्यक्ष । सहा कोटी आठ लक्ष । कानिफानें मिरवावे ॥

Transliteration

Chauteesa kotee baaraa lakshu | Shree-Jaalindaraane karaave pratyakshu | Sahaa kotee aatha lakshu | Kaaniphaane miravaave ||

Ovee 30

अशुभप्रयोग गोरक्षरहाटी । स्थापूनि योजावे शतकोटी । पुढें लोकां साधनजेठी । होणार नाहीं महाराजा ॥

Transliteration

Ashubha-prayoga Goraksha-rahaatee | Sthaapuni yojaave shata-kotee | Pudhe lokaa saadhana-jethee | Honaara naahee Mahaaraajaa ||

Ovee 31

म्हणूनि ऐसें योजूनि साधन । मंत्रप्रयोगीं करावें प्रवीण । तें न करितां सकळ जन । सुख होईल रोगांतें ॥

Transliteration

Mhanuni aise yojuni saadhanu | Mantra-prayogee karaave praveenu | Tey na karitaa sakala janu | Sukha hoeela rogaante ||

Ovee 32

तरी हे जनउपकारासाठीं । जीवा करावी आटाआटी । तुम्हांतें सांगावी ऐसी गोष्टी । नोहे सर्वज्ञ आम्हांते ॥

Transliteration

Taree hey jana-upakaaraa-saathee | Jeevaa karaavee aataa-aatee | Tumhaante saangaavee aisee goshtee | Nohe sarva-jnya aamhaante ||

Ovee 33

ही कलीची विद्या कलिसंधान । मिरवित आहे पूर्वीपासून । तुम्ही नवनाथ अवतार घेऊन । विद्या वर्तवीत असतां कीं ॥

Transliteration

Hee kaleechee vidyaa kali-sandhaanu | Miravita aahe poorvee-paasunu | Tumhee Navanaatha avataara ghevunu | Vidyaa vartaveeta asataa kee ||

//////Ovee 34 and 35 comibned version////////////

तुम्ही जाणणार भविष्योत्तर जाणोनि नाथा । तूं देवांसीं केली वार्ता । कानिफातें वर देतां । बोलिलासी हिता महाराजा ॥ ३४ ॥

Transliteration

Tumhee jaananaara bhavishya-uttara jaanoni Naathaa | Too devaansee kelee vaartaa Kaaniphaate vara detaa | Bolilaasee hitaa Mahaaraajaa ||

//////////Original version//////////

Ovee 34

तुम्ही जाणणार भविष्योत्तर । तरी या कलींत करावा प्रसार । आम्हीं सांगावें ऐसे थोर । तुम्हां योग्य साजेना ॥

Transliteration

Tumhee jaananaara bhavishya-uttaru | Taree yaa kaleenta karaavaa prasaaru | Aamhee saangaave aise thoru | Tumhaa yogya saajenaa ||

Ovee 35

भविष्योत्तर जाणोनि नाथा । तूं देवांसीं केली वार्ता । कानिफातें वर देतां । बोलिलासी हिता महाराजा ॥

Transliteration

Bhavishya-uttara jaanoni Naathaa | Too devaansee kelee vaartaa | Kaaniphaate vara detaa | Bolilaasee hitaa Mahaaraajaa ||

Ovee 36

तरी आतां आळस सांडूनि । जेवी मिरवावें कवित्वरत्न । जारण मारण उच्चाटन । कवित्वरचनीं मिरवावें ॥

Transliteration

Taree aataa aalasa sanduni | Jevee miravaave kavitva-ratnu | Jaarana maarana uchchaatanu | Kavitva-rachanee miravaave ||

Ovee 37

ऐसें सांगूनि उमानाथ । कानिफाविषयीं आणिक सांगत । यासी बैसवूनि पूर्ण तपास । समर्थपणें मिरवीं कां ॥

Transliteration

Aise sanguni Umaanaathu | Kaaniphaa-vishayee aanika saangatu | Yaasee baisavuni poorna tapaasu | Samarthapane miravee kaa ||

Ovee 38

ऐसें सांगता उमावर । अवश्य म्हणे जालिंदर । मग वर देऊनि रमावर । जाता झाला वैकुंठी ॥

Transliteration

Aise saangataa Umaavaru | Avashya mhane Jaalindaru | Maga vara deuni Ramaavaru | Jaataa jhaalaa Vaikunthee ||

Ovee 39

मग जालिंदर आणि कानिफनाथ । द्वादश वर्षें राहूनि तेथ । चाळीस कोटी वीस लक्षांत । उभें चरित्र रचियेलें ॥

Transliteration

Maga Jaalindara aani Kaaniphaa-Naathu | Dvaadasha varshe rahuni tethu | Chaaleesa kotee veesa lakshaantu | Ubhe charitra rachiyele ||

Ovee 40

तें आदिनाथें कवित्व पाहोन । पूर्ण झालें समाधान । मग म्हणे नागाश्वत्थी जाऊन । सिद्धीमार्गी पावावें ॥

Transliteration

Tey Aadi-Naathe kavitva paahonu | Poorna jhaale samaadhaanu | Maga mhane naagaa-shvatthee jaunu | Siddhee-maargee paavaave ||

Ovee 41

मग जालिंदर आणि कानिफनाथ । जाऊनि पाहिला नागाश्वत्थ । पूर्ण आहुती हवन तेथ । करुनि तोषवी वीरांते ॥

Transliteration

Maga Jaalindara aani Kaaniphaa-Naathu | Jauni paahilaa naaga-ashvatthu | Poorna aahutee havana tethu | Karuni toshavee veeraante ||

Ovee 42

सूर्यकुंडाचें आणुनि जीवन । बावन्न वीरा करी सिंचन । प्रसन्न करुनि त्यांचे मन । वरालागी घेतलें ॥

Transliteration

Soorya-kundaache aanuni jeevanu | Baavanna veeraa karee sinchanu | Prasanna karuni tyaanche manu | Varaa-laagee ghetale ||

Ovee 43

यापरी पुनः परतून । पाहते झाले बद्रिकाश्रम । मग कानिफातें तपा बैसवून । लोहकंटकी मिरवला ॥

Transliteration

Yaaparee punah paratunu | Paahate jhaale Badrikaa-Ashramu | Maga Kaaniphaate tapaa baisavunu | Lohakantakee miravalaa ||

Ovee 44

श्रीआदिनाथाच्या साक्षीसी । कानिफा बैसवून पूर्ण तपासी । श्रीजालिंदर तीर्थस्नानासी । जाता झाला पुसून ॥

Transliteration

Shree-Aadinaathaachyaa saaksheesee | Kaaniphaa baisavuna poorna tapaasee | Shree Jaalindara teertha-snaanaasee | Jaataa jhaalaa pusunu ||

Ovee 45

त्याचि ठायीं बद्रिकाश्रमांत । कानिफा आणि श्रीकृष्णनाथ । तप करिती भागीरथीतीरांत । तीव्र काननी बैसूनियां ॥

Transliteration

Tyaachi thaayee Badrikaa-Ashramaantu | Kaaniphaa aani Shree-Krishna-Naathu | Tapa karitee bhaageerathee-teeraantu | Teevra kaananee baisuniyaa ||

Ovee 46

उभय ठाव असे विभक्त । एकमेका नसे माहीत । असो येरीकडे जालिंदरनाथ । नानाक्षेत्रीं हिंडतसे ॥

Transliteration

Ubhaya thaava ase vibhaktu | Ekamekaa nase maaheetu | Aso yereekade Jaalindara-Naathu | Naanaa-kshetree hindatase ||

Ovee 47

परी क्षेत्रीं जातांचि आधीं काननीं । भारा बांधिला तृण कापूनि । निजमौळी त्वरें वाहुनी । क्षेत्रामाजी संचरे ॥

Transliteration

Paree kshetree jaataanchi aadhee kaananee | Bhaaraa baandhilaa trina kapuni | Nijamaulee tvare vaahunee | Kshetraamaajee sanchare ||

Ovee 48

परी तो मौळी भारा घेतां । सुख न वाटे अनिळचित्ता । मग संचरोनि भयहर्ता । वरच्यावरी धरीतसे ॥

Transliteration

Paree toh maulee bhaaraa ghetaa | Sukha na vaate anila-chittaa | Maga sancharoni bhayahartaa | Varachyaavaree dhareetase ||

Ovee 49

म्हणाल पवनासी काय कारण । वरचेवरी धरावया तृण । तरी जालिंदर अग्निनंदन । अग्निपिता तो असे ॥

Transliteration

Mhanaala pavanaasee kaaya kaaranu | Varachevaree dharaavayaa trinu | Taree Jaalindara agni-nandanu | Agni-pitaa toh ase ||

Ovee 50

परी पौत्राची करुनी ममता । म्हणूनि भारा धरी वरुता । असो जालिंदर क्षेत्रीं येतां । तृण गोधना सोडीतसे ॥

Transliteration

Paree pautraachee karunee mamataa | Mhanuni bhaaraa dharee varutaa | Aso Jaalindara kshetree yetaa | Trina godhanaa sodeetase ||

Ovee 51

ऐसें भ्रमण करितां महीं । नानातीर्थक्षेत्रयात्रा प्रवाहीं । तो गौडबंगाल देशाठायीं । हेलपट्टणीं पै आला ॥

Transliteration

Aise bhramana karitaa mahee | Naanaa-teertha-kshetra-yaatraa pravaahee | Toh gauda-bangaala deshaa-thaayee | Hela-pattanee pai aalaa ||

Ovee 52

तृणभार मिरवोनि माथीं । परी तो मिरवे सर्वांहातीं । अधर चाले मस्तकावरती । लोक पाहती निजदृष्टी ॥

Transliteration

Trina-bhaara miravoni maathee | Paree toh mirave sarvaan-haatee |
Adhara chaale mastakaa-varatee | Loka paahatee nija-drishtee ||

Ovee 53

हेलापट्टण अति विस्तीर्ण । बुद्धिप्रयुक्त तेथील जन । जालिंदराचें चिन्ह पाहून । आश्चर्य करिती मानसीं ॥

Transliteration

Helaa-pattana ati visteernu | Buddhi-prayukta tetheela janu |
Jaalindaraache chinha pahunu | Aashcharya karitee maanasee ||

Ovee 54

म्हणती अधर भारा कैसा । चालती हा न कळे तमाशा । तरी हा सिद्धा अवतारलेशा । महीलागीं मिरवीतसे ॥

Transliteration

Mhanatee adhara bhaaraa kaisaa | Chaalatee haa na kale tamaashaa |
Taree haa siddhaa avataara-leshaa | Mahee-laagee miraveetase ||

Ovee 55

मग ते चव्हाटयाचे जन । करुं धांवती तैं दर्शन । परी ते नाथा समाधान । चित्ती प्रशस्त लागेना ॥

Transliteration

Maga tey chavhaatyaa-che janu | Karu dhaavatee tai darshanu | Paree tey Naathaa samaadhaanu | Chittee prashasta laagenaa ||

Ovee 56

जे पूर्णपणे झाले निवाले । ते प्रतिष्ठेपासूनि दुरावले । कदा न जातां जगीं मानवले । चित्तीं निःस्पृहता धरुनियां ॥

Transliteration

Je poorna-pane jhaale nivaale | Tey pratishthe-paasuni duraavale | Kadaa na jaataa jagee maanavale | Chittee nihsprihataa dharuniyaa ||

Ovee 57

बृहस्पतीचे पडिपाडीं । तया होतसे सर्वार्थजोडी । परी तो वेडियांत मारी दडी । लोकमहिमाभयास्तव ॥

Transliteration

Brihaspateeche padipaadee | Tayaa hotase sarvaartha-jodee | Paree toh vediyaanta maaree dadee | Loka-Mahimaa-bhayaastava ||

Ovee 58

जैसें कृपण आपुले धन । रक्षी महीचे पाठीलागून । तन्न्याय झालिया मन । कदाकाळीं आवरेना ॥

Transliteration

Jaise kripana aapule dhanu | Rakshee maheeche paathee-laagunu |
Tannyaaya jhaaliyaa manu | Kadaa-kaalee aavarenaa ||

Ovee 59

असो मग जालिंदरनाथ । अति तोषें तृणभार जमवूनि आणीत । पाहुनि गोधनाची अमात । तृण सोडी तयांसी ॥

Transliteration

Aso maga Jaalindara-Naathu | Ati toshe trina-bhaara jamavuni aaneetu |
Paahuni godhanaachee amaatu | Trina sodee tayaansee ||

Ovee 60

मग गल्लीकुची गंधमोरी । तेथें जाऊनि वस्ती करी । भिक्षा मागूनि क्षेत्राभीतरी । उदरनिर्वाह करीतसे ॥

Transliteration

Maga gallee-kuchee gandha-moree | Tethe jauni vastee karee | Bhikshaa maguni kshetraa-bheetaree | Udara-nirvaaha kareetase ||

Ovee 61

यापरी वर्ततां त्या गांवींचा नृप । त्रिलोचनसुत जैसा कंदर्प । तयाचे वर्णिता स्वरुप । सरस्वतीसी न सुचे हो ॥

Transliteration

Yaaparee vartataa tyaa gaaveenchaa nripu | Trilochana-Suta jaisaa Kandarpu | Tayaache varnitaa svarupu | Sarasvateesee na suche ho ||

Ovee 62

नाम जयाचें गोपीचंद । वरी मिरवला सर्व संपत्तिवृंद । दिव्य अमूप अमरभद्र । पाहूनि लाजे कुबेर तो ॥

Transliteration

Naama jayaache Gopeechandu | Varee miravalaa sarva sampatti-vrindu | Divya amoopa amara-Bhadru | Pahuni laaje Kubera toh ||

Ovee 63

द्वादश लक्ष अपूर्वशक्ती । अश्व मिरवले वाताकृति । तेजःपुंज पाहूनि लाजती । चपळपणीं चपळा त्या ॥

Transliteration

Dvaadasha laksha apoorva-shaktee | Ashva miravale vaataa-kriti | Tejah-punja pahuni laajatee | Chapalapanee chapalaa tyaa ||

Ovee 64

चीरतगटीं रत्नकोंदणीं । पाखरा शोभल्या बालार्ककिरणीं । झगमगती झालरी किरणीं । हेमगुणीं मिरवल्या ॥

Transliteration

Cheera-tagatee ratna-kondanee | Paakharaa shobhalyaa baala-Arka-kiranee | Jhaga-magatee jhaalaree kiranee | Hemagunee miravalyaa ||

Ovee 65

रश्मी अति शोभायमान । झालरी अग्निहेमगुण । मुक्त गुंफिले समत्वीं समान । नक्षत्रमालिका जेवीं त्या ॥

Transliteration

Rashmee ati shobhaaya-maanu | Jhaalaree agni-hema-gunu | Mukta gumphile samatvee samaanu | Nakshatra-maalikaa jevee tyaa ||

Ovee 66

हेमतगटीं रत्नकोंदणीं । ग्रीवें मिरवल्या माळा भूषणीं । संगीत पेटया नवरंगरत्नी । दीप जैसे लाविले ॥

Transliteration

Hema-tagatee ratna-kondanee | Greeve miravalyaa maalaa bhooshanee | Sangeeta petyaa nava-ranga-ratnee | Deepa jaise laavile ||

Ovee 67

मुख शोभलें त्वाचिपरी । दिव्य मिरवल्या सरोवरीं । चातकपिच्छ कर्णद्वयाभीतरीं । तुरे खोविले मौळीतें ॥

Transliteration

Mukha shobhale tvaachi-paree | Divya miravalyaa sarovaree | Chaataka-pichcha karna-dvayaa-bheetaree | Ture khovile mauleete ||

Ovee 68

आणि पुष्पपृष्ठीं रत्नजडित । गेंदा जोडिया तेजभरित । चारजामे लखलखीत । चपळेहूनि अधिक ते ॥

Transliteration

Aani pushpa-prishthee ratna-jaditu | Gendaa jodiyaa teja-bharitu | Chaarajaame lakha-lakheetu | Chapalehuni adhika tey ||

Ovee 69

द्वादश लक्ष ऐसियेपरी । बाजी मिरवती चमूभीतरी । प्रत्येक पाहतां संमतसरी । उदधिसुत मिरविले ॥

Transliteration

Dvaadasha laksha aisiyeparee | Baajee miravatee chamoo-bheetaree | Pratyeka paahataa sammatasaree | Udadhi-Suta miravile ||

Ovee 70

कीं अर्कहृदयीं स्पृहा होती । मातें लाभली श्यामकर्ण मूर्ती । त्या स्पृहेची करावया शांती । द्वादश लक्ष प्रगटले ॥

Transliteration

Kee Arka-hridayee sprihaa hotee | Maate laabhalee shyaama-karna moortee | Tyaa sprihechee karaavayaa shaantee | Dvaadasha laksha pragatale ||

Ovee 71

त्याचिपरी गजसमूह मत । पाहूनि लाजे ऐरावत । चित्तीं म्हणे क्षोभूनि सर्वत्र । रत्नें उपजलीं महीवरी ॥

Transliteration

Tyaachiparee gaja-samooha matu | Pahuni laaje Airaavatu | Chittee mhane kshobhuni sarvatru | Ratne upajalee maheevaree ||

Ovee 72

विशाळ शुंडा हिरेजाती । अधरें द्वैतदंत शोभती । तयां वेष्टूनि चुडे पाहती । रत्नकोंदणीं मिरविले ॥

Transliteration

Vishaala shundaa hire-jaatee | Adhare dvaita-danta shobhatee | Tayaa veshtuni chude paahatee | Ratna-kondanee miravile ||

Ovee 73

ग्रीवे घंटिका हेमगुणीं । तयामाजीं रत्नपाणीं । हिरे माणिक पाचतरणी । नवरंगी शोभले ॥

Transliteration

Greeve ghantikaa hemagunee | Tayaa-maajee ratna-paanee | Hire maanika paachataranee | Navarangee shobhale ||

Ovee 74

यापरी पृष्ठीं झुली व्यक्त । तयांवरी झालरी लखलखीत । हेमगुणीं गोवूनि मुक्त । ढाळ देती सुरवाड ॥

Transliteration

Yaaparee prishthee jhulee vyaktu | Tayaa-varee jhaalaree lakhalakheetu | Hemagunee govuni muktu | Dhaala detee suravaadu ||

Ovee 75

यापरी हौदे मेघडंबरी । सुवर्ण अंबार्या शोभल्या वरी । त्याहीं कोंदणीं नक्षत्रापरी । रत्न मिरवूं लाहिले ॥

Transliteration

Yaaparee haude megha-dambaree | Suvarna ambaaryaa shobhalyaa varee | Tyaahee kondanee nakshatraa-paree | Ratna miravoo laahile ||

Ovee 76

कोणी रिक्त कोणी ऐसे । परी ते भासती पर्वत जैसे । पृष्ठीं पताका पहा भासे । पर्वतमौळी तरु जेवीं ॥

Transliteration

Konee rikta konee aise | Paree tey bhaasatee parvata jaise | Prishthee pataakaa pahaa bhaase | Parvata-maulee taru jevee ||

Ovee 77

जैसे गजपृथूतें मिश्र । विराजलेती दशसहस्त्र । पाईक स्वार दासचक्र । रायापुढें धांवती ॥

Transliteration

Jaise gaja-prithoote mishru | Viraajaletee dasha-sahastru | Paaeeka svaara daasachakru | Raayaa-pudhe dhaavatee ||

Ovee 78

छडीदार चोपदार । पूर्ण बोथाटे पुकारदार । यंत्रधारी अश्वगतास्वार । रायासमोर धांवती ॥

Transliteration

Chadeedaara chopadaaru | Poorna bothaate pukaara-daaru | Yantra-dhaaree ashvagata-svaaru | Raayaa-samora dhaavatee ||

Ovee 79

अति उग्र खडतरपती । मिरवल्या जैशा कृतांतमूर्ति । की युद्धकुंडींचें पावक होती । घेती आरती परचक्र ॥

Transliteration

Ati ugra khadatara-patee | Miravalyaa jaishaa kritaanta-moorti | Kee yuddha-kundeenche paavaka hotee | Ghetee aaratee parachakru ||

Ovee 80

यावरी राव तो कृपाळ । शोभे जैसा तमालनीळ । बरवेपणीं अतिझळाळ । कंदर्पपंथी मिरवतसे ॥

Transliteration

Yavaree raava toh kripaalu | Shobhe jaisaa tamaala-neelu | Barave-panee atijhalaalu | Kandarpa-panthee miravatase ||

Ovee 81

स्वरुपलक्षणी गोपीचंद । समता न पावे आणिक गौडवृंद । चंद्रचूडमण्यालागीं अबाध । कलंक देहीं म्हणोनी ॥

Transliteration

Svarupa-lakshanee Gopeechandu | Samataa na paave aanika gauda-vrindu | Chandra-chooda-manyaalaagee abaadhu | Kalanka dehee mhanonee ||

Ovee 82

अर्क दृष्टांता संमत देखा । तरी तोही तीव्र दाहकपंथा । चपला तेजापरी भ्याडा चित्ता । मेघामाजी दडताती ॥

Transliteration

Arka drishtaantaa sammata dekhaa | Taree tohee teevra daahaka-panthaa | Chapalaa tejaa-paree bhyaadaa chittaa | Meghaa-maajee dadataatee ||

Ovee 83

तैसा नव्हे हा नृपनाथ । दिव्यरुपी सद्गुणभरित । धर्म औदार्य सभाग्यवंत । विजयलक्ष्मी मिरवीतसे ॥

Transliteration

Taisaa navhe haa nripa-Naathu | Divyarupee sadguna-bharitu | Dharma audaarya sabhaagya-vantu | Vijaya-Lakshmee miraveetase ||

Ovee 84

म्हणाल प्रताप नसेल व्यक्त । तरी कृतांताचे आसन पाळीत । धाकें परचक्र आणूनि देत । कारभारातें न सांगतां ॥

Transliteration

Mhanaala prataapa nasela vyaktu | Taree kritaantaache aasana paaleetu | Dhaake parachakra anuni detu | Kaara-bhaaraate na saangataa ||

Ovee 85

यापरी वर्णितां शरीरपुष्टी । तरी म्हणवीतसे महींतें जेठी । शतजेठी महीपुटी । लावूनियां रगडीतसे ॥

Transliteration

Yaaparee varnitaa shareera-pushtee | Taree mhanaveetase maheente jethee | Shata-jethee mahee-putee | Lavuniyaa ragadeetase ||

Ovee 86

यापरी आणिक कल्पाल चित्तीं । कीं इतुकी स्थावर झाली शक्ती । तरी भोगीत नसेल कामरती । विषयीं आसक्त नसेल तो ॥

Transliteration

Yaaparee aanika kalpaala chittee | Kee itukee sthaavara jhaalee shaktee | Taree bhogeeta nasela kaama-ratee | Vishayee aasakta nasela toh ||

Ovee 87

तरी धर्मपत्नी शुभाननी । असती नक्षत्रतेजप्रकरणीं । खंजरीटमृगपंकजनयनी । चंद्राकृती मिरवल्या ॥

Transliteration

Taree dharma-patnee shubhaananee | Asatee nakshatra-teja-prakaranee | Khanjareeta-mriga-pankaja-nayanee | Chandraa-kritee miravalyaa ||

Ovee 88

चित्तज्ञ परम चातुर्यखाणी । यापरी षोडशशत शुभाननी । भोगांनना जयालागुनी । राजांकीं मिरवल्या ॥

Transliteration

Chittajnya parama chaaturya-khaanee | Yaaparee shodasha-shata shubhaananee | Bhogaannanaa jayaa-laagunee | Raajaankee miravalyaa ||

Ovee 89

परी ते पाहतां स्वरुपखाणी । कीं कामचि सांडावा ओवाळुनि । कीं उर्वशीच्या पंक्ती आणुनी । दासी मिरवती तिला त्या ॥

Transliteration

Paree tey paahataa svarupa-khaanee | Kee kaamachi saandaavaa ovaaluni | Kee Urvasheechyaa panktee aanunee | Daasee miravatee tilaa tyaa ||

Ovee 90

गजगामिनी चपला अबळा । तेजें लाजविती पाहूनि चपळा । शृंगारभरित असती सकळा । चंद्र रात्री नक्षत्री ॥

Transliteration

Gaja-gaaminee chapalaa abalaa | Teje laajavitee pahuni chapalaa | Shringaara-bharita asatee sakalaa | Chandra raatree nakshatree ||

Ovee 91

असो ऐसा नृपनाथ । हेलापट्टणी विराजीत । जयाची माता सद्‌गुणभरित । मैनावती विराजली ॥

Transliteration

Aso aisaa nripa-Naathu | Helaa-pattanee viraajeetu | Jayaachee maataa sadguna-bharitu | Mainaavatee viraajalee ||

Ovee 92

तंव ती सती मैनावती । कोणी एके दिवशीं उपरीवरती । दिशा न्याहाळी सहजस्थिती । जालिंदरातें देखिलें ॥

Transliteration

Tava tee satee Mainaavatee | Konee eke divashee uparee-varatee | Dishaa nyaahaalee sahaja-sthitee | Jaalindaraate dekhile ||

Ovee 93

तृणभार अधर मौळी । मुक्त विराजला हस्तकमळीं । पथिकासमान ग्राममेळीं । मार्गी येतसे पुढारां ॥

Transliteration

Trina-bhaara adhara maulee | Mukta viraajalaa hasta-kamalee | Pathikaasamaana graamamelee | Maargee yetase pudhaaraa ||

Ovee 94

परी तेजःपुंज जैसा तरणी । मदनाकृति स्वरुपखाणी । निःस्पृह निवृत्त योगींद्र मुनी । देखियला तियेनें ॥

Transliteration

Paree tejah-punja jaisaa taranee | Madanaakriti svarupa-khaanee | Nihspriha nivritta yogeendra Munee | Dekhiyalaa tiyene ||

Ovee 95

मग म्हणे मैनावती । अधर भारा मौळीवरती । कैसा चाले धैर्यशक्ती । काय असे तयातें ॥

Transliteration

Maga mhane Mainaavatee | Adhara bhaaraa maulee-varatee | Kaisaa chaale dhairya-shaktee | Kaaya ase tayaate ||

Ovee 96

नोहें आधार करबंधन । तेही मिरवती मुक्तमन । तरी हा कोणी प्रतापवान । महींलागीं उतरला ॥

Transliteration

Nohe aadhaara karabandhanu | Tehee miravatee muktamanu | Taree haa konee prataapavaanu | Mahee-laagee utaralaa ||

Ovee 97

गण किंवा गंधर्व सुरवर । विरिंची किंवा गंधर्व हरिहर । कीं वाचस्पती उशना थोर । प्रतापवान हा असे ॥

Transliteration

Gana kivaa Gandharva suravaru | Virinchee kivaa Gandharva Hariharu | Kee Vaachaspatee Ushanaa thoru | Prataapa-vaana haa ase ||

Ovee 98

परी सुदृढ आराधोनि भक्तीं । मिरवूं नरदेहसार्थकगती । प्रसन्न करुनि चित्तभगवती । अचळपद वरावें ॥

Transliteration

Paree sudridha aaraadhoni bhaktee | Miravoo nara-deha-saarthaka-gatee | Prasanna karuni chitta-Bhagavatee | Achalapada varaave ||

Ovee 99

ऐसा विचार करुनि मनीं । परिचारिके पाचारुनी । तेही सद्विवेकी सज्ञान प्राज्ञी । जगामाजी मिरवीतसे ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni manee | Parichaarike paachaarunee | Tehee sadvivekee sajnyaana praajnyee | Jagaa-maajee miraveetase ||

Ovee 100

मन्सुख उभी करसंपुटीं । जोडूनि बोले वागवटी । कवण अर्थ उदेला पोटीं । निवेदावा महाराज्ञी ॥

Transliteration

Mansukha ubhee kara-samputee | Joduni bole vaaga-vatee | Kavana artha udelaa potee | Nivedaavaa Mahaa-raajnyee ||

Ovee 101

येरी म्हणे वो गजगामिनी । अर्थ उदेला माझे मनीं । परी प्राणजीवित्व रक्षूनी । कार्य आपुलें साधावें ॥

Transliteration

Yeree mhane vo gaja-gaaminee | Artha udelaa maajhe manee | Paree praana-jeevitva rakshuunee | Kaarya aapule saadhaave ||

Ovee 102

प्रगट होता ती वार्ता । परम पडेल क्षोभ चित्ता । मग त्या उदकप्रवाहीं वाहतां । परम संकट मिरवेल ॥

Transliteration

Pragata hotaa tee vaartaa | Parama padela kshobha chittaa | Maga tyaa udaka-pravaahee vaahataa | Parama sankata miravelu ||

Ovee 103

म्हणोनि गौप्य धरोनि वचन । कार्यमांदुसा सोडिजे संधान । मग तें वर्णितां सभाग्यपण । अंबर ठेंगणें वाटतसे ॥

Transliteration

Mhanoni gaupya dharoni vachanu | Kaarya-maandusaa sodije sandhaanu | Maga tey varnitaa sabhaagyapanu | Ambara thengane vaatatase ||

Ovee 104

म्हणोनि तिनें उभवूनि तर्जनि । खुणें दाविलें तिजलागुनी । कोण येत प्रविष्टतरणी । मौळीं तृण वाहोनियां ॥

Transliteration

Mhanoni tine ubhavuni tarjani | Khune daavile tija-laagunee | Kona yeta pravishta-taranee | Maulee trina vaahoniyaa ||

Ovee 105

तंव ती खूण परिचारिका । पाहती झाली जालंदर विवेका । तों मौळीं भारा अधर देखा । सवें सवें चालतसे ॥

Transliteration

Tava tee khoona parichaarikaa | Paahatee jhaalee Jaalandara vivekaa | Toh maulee bhaaraa adhara dekhaa | Save save chaalatase ||

Ovee 106

तें पाहूनियां निजदृष्टीं । विस्मय करी आपुले पोटीं । म्हणे माय वो परम धूर्जटी । योगसिद्ध असे हा ॥

Transliteration

Tey pahuniyaa nija-drishtee | Vismaya karee aapule potee | Mhane Maaya vo parama Dhoorjatee | Yoga-Siddha ase haa ||

Ovee 107

कनकवर्ण बालार्ककिरणीं । महीं मिरवितसे योगप्राज्ञी । तरी हा स्वर्भूवर्लोकप्राणी । सहसा येत असे जननीये ॥

Transliteration

Kanakavarna baala-Arka-kiranee | Mahee miravitase yoga-praajnyee | Taree haa svar-bhoovar-loka-praanee | Sahasaa yeta ase jananeeye ||

Ovee 108

सत्यलोक भूलोक तपोलोक । तयाचे गमनें शोभती देख । स्मरारि कीं स्मरजनक । महीलागीं उतरला ॥

Transliteration

Satyaloka Bhooloka Tapoloku | Tayaache gamane shobhatee dekhu | Smaraari kee Smarajanaku | Mahee-laagee utaralaa ||

Ovee 109

तरी माय वो ऐक वचन । सलीलभक्तीं आराधून । तैं चित्तभगवती प्रसन्न करुन । कल्याणदरीं रिघावें ॥

Transliteration

Taree Maaya vo aika vachanu | Saleela-bhaktee aaraadhunu | Tai chitta-Bhagavatee prasanna karunu | Kalyaana-daree righaave ||

Ovee 110

जैसें ध्रुवानें अढळपद । जिंकूनि हरिला सकळ भेद । जन्ममृत्यूंचे दृढ बंध । मुक्त केले जननीये ॥

Transliteration

Jaise Dhruvaane adhalapadu | Jinkuni harilaa sakala bhedu | Janma-mrityoonche dridha bandhu | Mukta kele jananeeye ||

Ovee 111

तन्न्याय दास दासी । ओपूनि ऐशा शत पुरुषांसी । चिरंजीव प्रसाद ओपूनि देहासी । अचळ महीतें वर्तावें ॥

Transliteration

Tannyaaya daasa daasee | Opuni aishaa shata purushaansee | Chiranjeeva prasaada opuni dehaasee | Achala maheete vartaave ||

Ovee 112

ऐसी परिचारिकेची युक्ती । ऐकूनि बोले मैनावती । म्हणे माय वो तरुनि आर्ती । चित्तस्वरुप करावें ॥

Transliteration

Aisee parichaarikechee yuktee | Aikuni bole Mainaavatee | Mhane Maaya vo taruni aartee | Chitta-sva-rupa karaave ||

Ovee 113

तरी येवढा प्राज्ञीक ज्ञानी । वस्तीस राहतो कोणे स्थानीं । तितुकें गुज गोचर करुनी । लगबगें येईं कां ॥

Transliteration

Taree yevadhaa praajnyeeka jnyaanee | Vasteesa raahato kone sthaanee | Tituke guja gochara karunee | Lagabage yeee kaa ||

Ovee 114

अवश्य म्हणोनि परिचारिका । जाती झाली सदैविका । तंव तो संचारुनि ग्रामलोका । गोधनांतें पाहतसे ॥

Transliteration

Avashya mhanoni parichaarikaa | Jaatee jhaalee sadaivikaa | Tava toh sanchaaruni graamalokaa | Godha-naante paahatase ||

Ovee 115

तंव तीं गोधनें ग्रामवाटीं । अपार जात असती चव्हाटीं । तृण सोडूनि ते थाटी । सुपंथी तेथ गमतसे ॥

Transliteration

Tava tee godhane graamavaatee | Apaara jaata asatee chavhaatee | Trina soduni tey thaatee | Supanthee tetha gamatase ||

Ovee 116

तंव ती दासी मागे मागे । जात असे लगबगें । मग गंधगल्लीं कुश्चळयोगें । जाऊनियां बैसला ॥

Transliteration

Tava tee daasee maage maage | Jaata ase lagabage | Maga gandhagallee kushchalayoge | Jauniyaa baisalaa ||

Ovee 117

तेथें क्षण एक उभी राहून । पहात त्याचें अचळपण । सूर्य पावें तों अस्तमान । अचळस्थान रक्षिलें ॥

Transliteration

Tethe kshana eka ubhee rahunu | Pahaata tyaache achalapanu | Soorya paave toh astamaanu | Achala-sthaana rakshile ||

Ovee 118

मग ती येऊनि वाताकृती । पूर्ण झाली सांगती । अमुक स्थानीं चित्तभगवती । प्रसन्नचित्तीं स्थिरावे ॥

Transliteration

Maga tee yeuni vaataa-kritee | Poorna jhaalee saangatee | Amuka sthaanee chitta-Bhagavatee | Prasanna-chittee sthiraave ||

Ovee 119

कुश्चित जागा दुर्गंधव्यक्त । माये वो असे सर्व एकांत । तया स्थानीं पिशाचवत । वस्तीलागीं ठिकाण ॥

Transliteration

Kushchita jaagaa durgandha-vyaktu | Maaye vo ase sarva ekaantu | Tayaa sthaanee pishaacha-Vata | Vasteelaagee thikaanu ||

Ovee 120

जेथे न राहे श्वानसूकर । कर्दम कुवेग गंध अपार । वस्ती विराजून पिशाचसर । वल्गना ते वदतसे ॥

Transliteration

Jethe na raahe shvaana-sookaru | Kardama kuvega gandha apaaru | Vastee viraajuna pishaacha-saru | Valganaa tey vadatase ||

Ovee 121

ऐसी ऐकूनि तियेची वाणी । म्हणे स्थिर वो शुभाननी । रहित होतां जनसंबोध यामिनी । मग जाऊं दर्शना ॥

Transliteration

Aisee aikuni tiyechee vaanee | Mhane sthira vo shubhaananee | Rahita hotaa jana-sambodha yaaminee | Maga jaaoo darshanaa ||

Ovee 122

अवश्य म्हणोनि परिचारिका । मग मध्ययामिनीं सद्विवेका । उत्तम फळ ठेऊनि तबकां । षड्रसाने मिरविलें ॥

Transliteration

Avashya mhanoni parichaarikaa | Maga madhya-yaaminee sadvivekaa | Uttama phala theuni tabakaa | Shadrasaane miravile ||

Ovee 123

काळीं कांबळी गुंतूनि बुंथी । परिचारिका मैनावती । येत्या जाहल्या स्थान एकांती । लक्षोनियां महाराजा ॥

Transliteration

Kaalee kaambalee guntuni bunthee | Parichaarikaa Mainaavatee | Yetyaa jaahalyaa sthaana ekaantee | Lakshoniyaa Mahaaraajaa ||

Ovee 124

तंव तो सिद्धरायमुनी । परमहंसाच्या आव्हानूनि वहनीं । मोक्षमुक्ताच्या ग्रहणार्थ ध्यानीं । बैसलासे महाराजा ॥

Transliteration

Tava toh siddha-raayamunee | Parama-hansaachyaa aavhaanuni vahanee | Moksha-muktaachyaa grahanaartha dhyaanee | Baisalaase Mahaaraajaa ||

Ovee 125

मग त्या उभय सहित युवती । जाऊनि लोटल्या पदावरती । मूर्ध्नीकमळ प्रेमभरती । पदकमळीं ओपिती ॥

Transliteration

Maga tyaa ubhaya sahita yuvatee | Jauni lotalyaa padaa-varatee | Moordhnee-kamala prema-bharatee | Pada-kamalee opitee ||

Ovee 126

सन्मुख जोडूनि उभय कर । सप्रेम भक्ती वागुच्चार । चातुर्यगंध म्लान अपार । समर्पिली लाखोली ॥

Transliteration

Sanmukha joduni ubhaya karu | Saprema bhaktee vaag-uchchaaru | Chaaturya-gandha mlaana apaaru | Samarpilee laakholee ||

Ovee 127

म्हणसी महाराजा सर्वज्ञराशी । त्रिविधताप उभय उद्देशी । ते तूं दाहिले जीवित्वासीं । मोक्षमांदुसा जाणूनियां ॥

Transliteration

Mhanasee Mahaaraajaa sarvajnya-raashee | Trividhataapa ubhaya uddeshee | Tey too daahile jeevitvaasee | Moksha-maandusaa jaanuniyaa ||

Ovee 128

तरी ऐशिया तपोदरीं । समयजलदा लक्षूनि अंतरी । कल्पनासदनाचा पेटला भारी । विझवावया पातलों ॥

Transliteration

Taree aishiyaa tapodaree | Samayajaladaa lakshuni antaree | Kalpanaa-sadanaachaa petalaa bhaaree | Vijhavaavayaa paatalo ||

Ovee 129

तरी औदार्याचें पाहूनि मुख । त्रिविधतापांचा सबळ पावक । विझवूनि चित्तमहीतें पिक । ब्रह्मकर्णी पिकावें ॥

Transliteration

Taree audaaryaache pahuni mukhu | Trividhataa-paanchaa sabala paavaku | Vijhavuni chittamaheete piku | Brahmakarnee pikaave ||

Ovee 130

ऐसें तयाचें वागुत्तर । प्रविष्ट होतां निशिकर । तेणेंकरुनि चित्तसागर । आनंदलहरीं दाटला ॥

Transliteration

Aise tayaache vaag-uttaru | Pravishta hotaa nishikaru | Tenekaruni chitta-saagaru | Aananda-laharee daatalaa ||

Ovee 131

दाटला परी संकोचित । चंद्र आकाशीं उदधि महींत । तरी भक्तिपंथिका चक्रवात । अस्ताचळीं योजावा ॥

Transliteration

Daatalaa paree sankochitu | Chandra aakaashee udadhi maheentu | Taree bhakti-panthikaa chakra-vaatu | Astaachalee yojaavaa ||

Ovee 132

ऐसे चित्त योजूनि नाथा । दाविता झाला तीव्रवार्ता । मैनावतीचे सकळ चित्ता । किंवा कसोटीं पाहतसे ॥

Transliteration

Aise chitta yojuni Naathaa | Daavitaa jhaalaa teevra-vaartaa | Mainaavateeche sakala chittaa | Kimvaa kasotee paahatase ||

Ovee 133

पिशाच चेष्टा उद्दामनीती । आव्हानूनि सदृढयुक्तीं । महीचे पाषाण हातीं । कवळोनियां झुगारी ॥

Transliteration

Pishaacha cheshtaa uddaa-maneetee | Aavhaanuni sadridha-yuktee | Maheeche paashaana haatee | Kavaloniyaa jhugaaree ||

Ovee 134

अशुभवाणीं करुनि वल्गना । भंगूं पाहे चित्तप्रेमा । मेघऔदार्याच्या दुर्गुणा । पाषाणकारका ओसांडी ॥

Transliteration

Ashubha-vaanee karuni valganaa | Bhangoo paahe chittapremaa | Megha-audaaryaachyaa durgunaa | Paashaana-kaarakaa osaandee ||

Ovee 135

परी ते जाया धैर्यवंत । निश्चयअर्गळी योजूनि सदृढ चित्त । म्हणे याचे हस्तें मृत्य । आल्या मोक्ष वरीन मी ॥

Transliteration

Paree tey jaayaa dhairya-vantu | Nishchaya-argalee yojuni sadridha chittu | Mhane yaache haste mrityu | Aalyaa moksha vareena mee ||

Ovee 136

ऐसें योजूनि सदृढ मांडी । बैसली ठाव कदा न सांडी । जैसा पर्वत अचळ विभांडी । मेघधारा न गणोनि ॥

Transliteration

Aise yojuni sadridha maandee | Baisalee thaava kadaa na saandee | Jaisaa parvata achala vibhaandee | Megha-dhaaraa na ganoni ||

Ovee 137

परी तो नाथ जालिंदर । ओसंडितां पाषाणपूर । परी ती रामा वज्राकार । अचळ पाहूनि तोषला ॥

Transliteration

Paree toh Naatha Jaalindaru | Osanditaa paashaana-pooru | Paree tee Raamaa vajraakaaru | Achala pahuni toshalaa ||

Ovee 138

मग हस्तें झाडूनि पाषाणद्याडी । म्हणे कोण तूं सांग गोरटी । किमर्थ आजि माझिये पृष्ठीं । लागपाळती केली त्वां ॥

Transliteration

Maga haste jhaaduni paashaana-dyaadee | Mhane kona too saanga goratee | Kimartha aaji maajhiye prishthee | Laaga-paalatee kelee tvaa ||

Ovee 139

दुर्गंधी गल्ली ओंगळींत । आहे उगलाचि मी पिशाच येथ । तरी तुज पेटला किमर्थ अर्थ । कामानळें दाटला ॥

Transliteration

Durgandhee gallee ongaleentu | Aahe ugalaachi mee pishaacha yethu | Taree tuja petalaa kimartha arthu | Kaamaanale daatalaa ||

Ovee 140

कवण कोणाची नितंबिनी । वेगीं वद वो शुभाननी । आम्ही तपी अलक्ष ध्यानीं । लक्ष भंगाया कां आलीस ॥

Transliteration

Kavana konaachee nitambinee | Vegee vada vo shubhaananee | Aamhee tapee alaksha dhyaanee | Laksha bhangaayaa kaa aaleesu ||

Ovee 141

यावरी म्हणे ती महाराजा । त्रिलोचनराज विजयध्वजा । तयाची कांता सर्वज्ञभोजा । धर्मपत्नी मी असें ॥

Transliteration

Yavaree mhane tee Mahaaraajaa | Trilochana-raaja vijaya-dhvajaa | Tayaachee kaantaa sarvajnya-bhojaa | Dharma-patnee mee ase ||

Ovee 142

असे परी जी योगद्रुमा । काळें भक्षूनि पतिउत्तमा । मातें केलें प्लवंगमा । जगामाजी मिरवावया ॥

Transliteration

Ase paree jee Yogadrumaa | Kaale bhakshuni pati-uttamaa | Maate kele plavan-gamaa | Jagaa-maajee miravaavayaa ||

Ovee 143

ऐसेपरी योगजेठी । काळचक्र पाहूनि राहटी । मग भयार्कउदक पाहूनि पोटीं । पश्चातापी मिरविलें ॥

Transliteration

Aiseparee Yoga-jethee | Kaala-chakra pahuni raahatee | Maga bhaya-Arka-udaka pahuni potee | Pashchaa-taapee miravile ||

Ovee 144

काळें पतीची केली गती । तैसीच करील मम आहुती । तरी मानवसन्निपातीं । आरुक मातें होई कां ॥

Transliteration

Kaale pateechee kelee gatee | Taiseecha kareela mama aahutee | Taree maanava-sannipaatee | Aaruka maate hoee kaa ||

Ovee 145

येरि म्हणे त्वद्भर्ता । पावोनि लया त्वरिता । कवण आश्रमीं काळचरिता । लोटसी तूं जननीये ॥

Transliteration

Yeri mhane tvadbhartaa | Paavoni layaa tvaritaa | Kavana ashramee kaala-charitaa | Lotasee too jananeeye ||

Ovee 146

येरी म्हणे वो सदैवभरिता । सुत एक आहे प्रपंचा । येरु म्हणे कवण अर्था । प्रपंचराहटी चालवी ॥

Transliteration

Yeree mhane vo sadaiva-bharitaa | Suta eka aahe prapanchaa | Yeru mhane kavana arthaa | Prapancha-raahatee chaalavee ||

Ovee 147

तंव ती म्हणे गौडबंगाल । राज्यसदनीं देश विपुल । तयाचा नृप गोपीचंद मूल । दास तुमचा विराजे ॥

Transliteration

Tava tee mhane gauda-bangaalu | Raajya-sadanee desha vipulu | Tayaachaa nripa Gopeechanda moolu | Daasa tumachaa viraaje ||

Ovee 148

परी असो कर्मराहटी । कृतांतउद्देशाचे पाठीं । मम मौळींचा भार निवटीं । कृपा झणीं करुनियां ॥

Transliteration

Paree aso karmaraahatee | Kritaanta-uddeshaache paathee | Mama mauleenchaa bhaara nivatee | Kripaa jhanee karuniyaa ||

Ovee 149

ऐसें ऐकूनि तियेचें वचन । म्हणे कृतांतपाश दृढबंधन । कैसें तुटे गे मग पिशाचान । तुवां काय जाणितले ॥

Transliteration

Aise aikuni tiyeche vachanu | Mhane kritaanta-paasha dridhabandhanu | Kaise tute ge maga pishaachaanu | Tuvaa kaaya jaanitale ||

Ovee 150

तरी आतां क्षण उभी न राहीं । वेगीं आपुल्या सदना जाईं । तव सुता कळतां अनर्थप्रवाहीं । मति त्याची मिरवेल ॥

Transliteration

Taree aataa kshana ubhee na raahee | Vegee aapulyaa sadanaa jaaee | Tava sutaa kalataa anarthapravaahee | Mati tyaachee miravelu ||

Ovee 151

ऐसें बोलतां सांगोपांग । तों मित्रउदयाचा पाहिला मार्ग । मग नमस्कारुनि स्वामी सवेग । सदनाप्रती पातली ॥

Transliteration

Aise bolataa saango-paangu | Toh mitra-udayaachaa paahilaa maargu | Maga namaskaaruni svaamee savegu | Sadanaa-pratee paatalee ||

Ovee 152

पातली परी अर्थवियोग । चित्तसरितीं दाटला भाग । अति तळमळे प्रसादमार्ग । कृपार्णवीं भेटावया ॥

Transliteration

Paatalee paree artha-viyogu | Chittasaritee daatalaa bhaagu | Ati talamale prasaada-maargu | Kripaarnavee bhetaavayaa ||

Ovee 153

ऐसी तळमळे दुःखव्यथा । तों दिनकर लोटला अस्ता । होतां चंद्रविकास ती वनिता । विकासली आनंदे ॥

Transliteration

Aisee talamale duhkha-vyathaa | Toh dinakara lotalaa astaa | Hotaa chandravikaasa tee vanitaa | Vikaasalee aanande ||

Ovee 154

पुन्हां घेऊनि परिचारिका । तेथें आली सदयविवेका । दृष्टीं पाहूनि योगिमृगांका । चरणीं माथा ठेवीतसे ॥

Transliteration

Punhaa ghevuni parichaarikaa | Tethe aalee sadaya-vivekaa | Drishtee pahuni yogi-mrigaankaa | Charanee maathaa theveetase ||

Ovee 155

मग सलगभक्तीची करुनि दाटी । सदृढ चरणीं घातली मिठी । पद कवळोनि हस्तपूटीं । पद चुरीत प्रेमानें ॥

Transliteration

Maga salagabhakteechee karuni daatee | Sadridha charanee ghaatalee mithee | Pada kavaloni hastapootee | Pada chureeta premaane ||

Ovee 156

ऐशी सेवा दोन प्रहर । करितां अगम्यलीला प्रभाकर । तें पाहूनि नमस्कार । स्वामीसी करुणा उठतसे ॥

Transliteration

Aishee sevaa dona praharu | Karitaa agamya-leelaa Prabhaakaru | Tey pahuni namaskaaru | Svaameesee karunaa uthatase ||

Ovee 157

पुन्हां येऊनियां सदनीं । आचरे आपुली प्रपंचराहणी । अस्त होताचि वासरमणी । स्वामीसी जाऊनि लक्षीतसे ॥

Transliteration

Punhaa yeuniyaa sadanee | Aachare aapulee prapancha-raahanee | Asta hotaachi vaasara-manee | Svaameesee jauni laksheetase ||

Ovee 158

सद्भाव उदय दावूनि प्रेमा । सेवा करीतसे मनोधर्मा । परी सेवा करितां षण्मासउगमा । दिन लोटूनि गेले पैं ॥

Transliteration

Sadbhaava udaya daavuni premaa | Sevaa kareetase mano-dharmaa | Paree sevaa karitaa shanmaasa-ugamaa | Dina lotuni gele pai ||

Ovee 159

यापरीं कोणे एके दिवशीं । काळुखी दाटली अपार महीसी । परी सेवा करावयासी । पातली नित्यनेमानें ॥

Transliteration

Yaaparee kone eke divashee | Kaalukhee daatalee apaara maheesee | Paree sevaa karaavayaasee | Paatalee nitya-nemaane ||

Ovee 160

तंव ती मूर्ध्नीखाली अंक । ठेऊनियां देतसे टेंक । त्या संधींत योगिनायक । काय करिता झाला पैं ॥

Transliteration

Tava tee moordhneekhaalee anku | Theuniyaa detase tenku | Tyaa sandheenta yoginaayaku | Kaaya karitaa jhaalaa pai ||

Ovee 161

मायिक सबळ करुनि भ्रमर । रुंजी घाली तियेवर । न कळतां येऊनि महीवर । अंकाखाली रिघाला ॥

Transliteration

Maayika sabala karuni bhramaru | Runjee ghaalee tiyevaru | Na kalataa yeuni maheevaru | Ankaa-khaalee righaalaa ||

Ovee 162

ऐसें करुनि अवस्थेंत । आपण गाढ झाले निद्रिस्त । चलनवलन सांडूनि स्थित । कंठी घोर वाजवी ॥

Transliteration

Aise karuni avasthentu | Aapana gaadha jhaale nidristu | Chalana-valana sanduni sthitu | Kanthee ghora vaajavee ||

Ovee 163

तंव तो षट्पद जानूपरी । फोडूनि निघाला नेटें उपरी । ग्रीवे डसूनि जालिंदरा परी । सुचविलें अर्थातें ॥

Transliteration

Tava toh shatpada jaanooparee | Phoduni nighaalaa nete uparee | Greeve dasuni Jaalindaraa paree | Suchavile arthaate ||

Ovee 164

तंव तो लगबगें अति त्वरित । उठोनि हस्तें पाहे ग्रीवेंत । ग्रीवा पाहोनि सतीअंकांत । दृष्टी करी महाराजा ॥

Transliteration

Tava toh lagabage ati tvaritu | Uthoni haste paahe greeventu | Greevaa paahoni satee-ankaantu | Drishtee karee Mahaaraajaa ||

Ovee 165

अंक फोडोनि पडे छिद्र । रुधिर दाटलें महीं अपार । तें पाहूनियां जालिंदर । धैर्यबळ ओळखिले ॥

Transliteration

Anka phodoni pade chidru | Rudhira daatale mahee apaaru | Tey pahuniyaa Jaalindaru | Dhairyabala olakhile ||

Ovee 166

मग सहज कृपेची करोनि दृष्टी । मौळी कुरवाळी कृपाजेठी । मग तारकमंत्र कर्णपुटीं । उपदेशिला तत्काळ ॥

Transliteration

Maga sahaja kripechee karoni drishtee | Maulee kuravaalee kripaajethee | Maga Taaraka-mantra karnaputee | Upadeshilaa tatkaalu ||

Ovee 167

मंत्रउपदेश ओपितां कानीं । खूण व्यक्त दाविली संजीवनी । तेणें खुणें पारायणीं । ब्रह्मव्यक्त झालीसे ॥

Transliteration

Mantra-upadesha opitaa kaanee | Khoona vyakta daavilee sanjeevanee | Tene khune paaraayanee | Brahma-vyakta jhaaleese ||

Ovee 168

किंबहुना चराचरीं । जीव तितुका संगमस्थावरीं । अहंब्रह्म भुवनापासुनि आकारीं । ब्रह्मदृष्टी हेलावे ॥

Transliteration

Kimbahunaa charaa-charee | Jeeva titukaa sangama-sthaavaree | Aham-brahma bhuvanaa-paasuni aakaaree | Brahma-drishtee helaave ||

Ovee 169

ऐसा होतां चमत्कार । मग मौळी ठेवी चरणावर । म्हणे महाराजा सकळ व्यापार । आजि मिरवला सुगमत्वें ॥

Transliteration

Aisaa hotaa chamatkaaru | Maga maulee thevee charanaa-varu | Mhane Mahaaraajaa sakala vyaapaaru | Aaji miravalaa sugamatve ||

Ovee 170

यापरी तो कृपाळू मोक्षदानी । आणिक करिता झाला करणी । मंत्रप्रयोगें संजीवनी । ते देहीं प्रेरीतसे ॥

Transliteration

Yaaparee toh kripaaloo mokshadaanee | Aanika karitaa jhaalaa karanee | Mantra-prayoge sanjeevanee | Tey dehee prereetase ||

Ovee 171

जी निर्जीवित्वा उठवील । ती जीवित्वा काय न करील । असो मैनावतीसी अमरवेल । देहीं होऊनि ठेविलीसे ॥

Transliteration

Jee nirjeevitvaa uthaveelu | Tee jeevitvaa kaaya na kareelu | Aso Mainaavateesee amaravelu | Dehee houni thevileese ||

Ovee 172

जैसें रामें दानवकुशीं । चिरंजीव केले बिभीषणासी । तन्यायें मैनावतीसी । श्रीजालिंदरे केले पैं ॥

Transliteration

Jaise Raame daanava-kushee | Chiranjeeva kele Bibheeshanaasee | Tannyaaye Mainaavateesee | Shree Jaalindare kele pai ||

Ovee 173

मग नित्यनित्य प्रेमभक्ती । विशाल मिरवे भावस्थिती । परी आणिक काम उदेला चित्तीं । पुत्रमोहेंकरोनियां ॥

Transliteration

Maga nitya-nitya prema-bhaktee | Vishaala mirave bhaava-sthitee | Paree aanika kaama udelaa chittee | Putramohe-karoniyaa ||

Ovee 174

मनांत म्हणे चमत्कार । जानू भेदिली स्थिर भ्रमरें । त्या दुःखाचा घाय अनिवार । जानू वरी मिरवला ॥

Transliteration

Manaanta mhane chamatkaaru | Jaanoo bhedilee sthira bhramare | Tyaa duhkhaachaa ghaaya anivaaru | Jaanoo varee miravalaa ||

Ovee 175

घाय पडतां अनिवार । अशुद्धाचा लोटला पूर । तयावरी स्पर्शतां कर । जैसी तैसी मिरविली ॥

Transliteration

Ghaaya padataa anivaaru | Ashuddhaachaa lotalaa pooru | Tayaa-varee sparshataa karu | Jaisee taisee miravilee ||

Ovee 176

तरी सध्यां चमत्कार । झाला मम दृष्टीं गोचर । आणिक केले सनातनसार । ब्रह्मव्यक्तिपरायण ॥

Transliteration

Taree sadhyaa chamatkaaru | Jhaalaa mama drishtee gocharu | Aanika kele sanaatana-saaru | Brahmavyakti-paraayanu ||

Ovee 177

तरी चिरंजीवपद देऊनि मातें । अचल केलें त्रैलोक्यातें । याचि रीतीं माझ्या सुतातें । होतें तरी फार बरवें ॥

Transliteration

Taree chiranjeevapada deuni maate | Achala kele trailokyaate | Yaachi reetee maajhyaa sutaate | Hote taree phaara barave ||

Ovee 178

ऐसें योजूनि दृढ मानसीं । वियोगव्यथा वरिली देहासी । ती व्यथा नरहरिवंशीं । धुंडीसुत मालू सांगे ॥

Transliteration

Aise yojuni dridha maanasee | Viyogavyathaa varilee dehaasee | Tee vyathaa Narahari-vamshee | Dhundee-Suta Maaloo saange ||

Ovee 179

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । त्रयोदशाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha-Kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Trayodasha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu
Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार त्रयोदशाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Trayodasha Adhyaya Samapth